सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/एनएसएस/२०२५/ 2840

दिनांक :- 10 OCT 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या
शासकीय/ अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित पदविका संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- "युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक अभूतपूर्व अशी मानवंदना देण्यासाठी दुर्गोत्सव साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांचे पत्र क्र. अमृत/दुर्गोत्सव/२०२५/३५२, दि.२४/०९/२०२५

**२.** मा.अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र. ८८ / (२६१/२०२५)समन्वय, दिनांक ०३/१०/२०२५

३.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचा दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचा ई-मेल

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक अभुतपूर्व अशी मानवंदना देण्यासाठी दुर्गोत्सव आपल्या महाविद्यालयामध्ये साजरा करण्याकरिता सोहळयाची संकल्पना व कार्यक्रम वेळापत्रक सदरहू पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

तरि सोबतच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनाप्रमाणे आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यलयास सादर करावा.

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

**(मनोज म. अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

का.१६/संकीर्ण/वंदेमातरम्/२०२५/ २२५ दिनांक: 7 OCT 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म.रा., मुंबई

विषय :- दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी राज्यात "वंदे मातरम्" या गीताचे सामुहीक गान स्पर्धा राबविण्याबाबत.

संदर्भ :- मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. कौ,उद्यो,रोज,नावि/टिप्पणी/०९५६/२०२५, दि.१८ सप्टेंबर, २०२५ चे पत्र.


उपरोक्त विषयाबाबत मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांचे सोबत जोडलेले संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीतास १५० वर्ष पूर्ण आहेत. त्यानुषंगाने दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी राज्यातील सर्व तालुक्यामध्ये "वंदे मातरम्" या गीताचे सामुहीक गान होणार आहे. त्यामुळे आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयामध्ये देशभक्ती पर जाणीव निर्माण व्हावी यांचा समग्र विचार करुन विविध स्पर्धा राबविण्यात याव्यात. सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संबंधीतांना सूचना देवून सहकार्य करावे. तसेच सदर कार्यक्रमास महाविद्यालयीन अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

(डॉ.सुनिल भामरे)
सह संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

Desktop/MD/Statistic Information letter

३५
२३/९/२५



जा.क्र.मंत्री को उद्या /राज./मवि./टिप्पणी/ /२० दि.
०९५६/२०२५

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक : 18 SEP 2025

दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीतास १५० वर्ष पुर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने दि. ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये "वंदे मातरम्" या गीताचे सामुहीक गान होणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती पर जाणीव निर्माण व्हावी यांचा समग्र विचार करून विविध शालेय / महाविद्यालयीन स्पर्धा राबविण्यात याव्यात. सदरील स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील याबाबत आपल्या स्तरावरून सर्व संबधीतांना सुचना देवून सहकार्य करावे.

तसेच आपल्या तालूक्याच्या ठिकाणी होणाऱ्या उपरोक्त "वंदे मातरम्" या गीताच्या सामुहीक गान प्रंसगी सर्व शालेय / महाविद्यालयीन अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहणेबाबत सुचना देऊन सहकार्य करावे.

श्री. सावंत

मंगलप्रभात लोढा
**( मंगलप्रभात लोढा )**

**प्रति,**

**१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य.**
**२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य.**
**३. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य.**

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२ ...